बृहनमुंबई महानगरपालिका

क्र. सआ/मालमत्ता/ १००२१ /द.प्र.अधि./एसआरए, दि.०५.११.२०१४

**-: सुधारित परिपत्रक :-**

''विषय : महापालिका भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे परिशिष्ट-दोन महापालिका संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ : क्र. सआ/मालमत्ता/२४०७० /प्र.अ.(सगृसं)/एसआरए, दि.६.५.२०१४

उपरोक्त संदर्भान्वये दि. ६.५.२०१४ रोजी महापालिका भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे परिशिष्ट-दोन महापालिका संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याकरिता परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते.

महापालिकेच्या भूभागावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता, विभागाचे सहाय्यक आयुक्त हे सक्षम अधिकारी आहेत. तसेच सदर योजनेकरिता परिपत्रक क्र.सआ/मालमत्ता/२०१२/स.अ.(सु) २, दि. १६.५.२०१२ अन्वये महापालिकेच्या विविध प्राधिकरणाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तांत्रिक समितीने घेतलेल्या निर्णयानुसार, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) कार्यालयामार्फत जमिन मालक म्हणून परिशिष्ट-२ वितरीत करण्यास ना हरकत देण्यात येते.

माहिती अधिकार तांत्रिक समितीची दि.३१.१०.२०१४ रोजी मान. महापालिका आयुक्त यांच्या दालनात सभा घेण्यात आली होती. सभेच्या निर्णयानुसार विभागीय सहाय्यक आयुक्त हे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाची प्रारुप व अंतिम परिशिष्ट-२ जनतेकरिता, आय.टी.सेल यांच्यामार्फत महापालिका संकेत स्थळावर प्रसिध्द करतील. याकरिता विभागातील प्रस्तावित झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाची प्रारुप व अंतिम परिशिष्ट-२, पी.डी.एफ स्वरुपात mcgmportal.it@mcgm.gov.in व ac01.it@mcgm.gov.in ई मेल आयडी वर पाठविण्यात यावे. तदनंतर आयटीसेल मार्फत त्यास प्रसिध्दी देण्यात येईल.

विभागीय सहाय्यक आयुक्तांमार्फत सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्याकडे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव पाठविताना प्रस्तावित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता तयार करण्यात आलेल्या प्रारुप परिशिष्ट-दोन ( Draft Annexure - II ) हे योजनेच्या ठिकाणी व महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे, अशी टिप्पणी कागदपत्रांच्या पूर्ततेसहीत सादर करणे आवश्यक राहील. तसेच तांत्रिक समितीने मंजुर केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता जमिन मालक म्हणून ना-हरकत मालमत्ता खात्याकडून दिल्यानंतर, सदर योजनेकरिता अंतिम परिशिष्ट-२ ( Final Annexure - II ) हे सुध्दा महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केल्यानंतर विभागीय सहाय्यक आयुक्त यांनी ते झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पाठविणे बंधनकारक आहे.

उपरोक्त कार्यवाहीकरिता विभागीय सहाय्यक आयुक्त पूर्णत: जबाबदार असतील, याची सर्व विभागीय सहाय्यक आयुक्त यांनी नोंद घ्यावी. सदर परिपत्रक दि.६.५.२०१४ पासून अंमलात येईल.

3/11/14

सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)

सहाय्यक आयुक्त 'ए'', 'बी'', 'सी'', 'डी'', 'इ'', एफ/द, एफ/उ, जी/द, जी/उ, एच/पूर्व, एच/पश्चिम,के/पूर्व के/पश्चिम, एल, पी/दक्षिण, पी/उ, आर/द, आर/मध्य, आर/उत्तर, एम/पू, एम/प, एन, एस व टी विभाग, सहाय्यक आयुक्त (बाजार)

D:\SRA\Circular.doc

बृहन्मुंबई महानगरपालिका
सहायक आयुक्त (बाजार)
यांचे कार्यालय

21 NOV 2014

3213 19409

A E MARKET
DY SM I/C
A O MARKET
ASM CITY
ASM W/S
ASM E/S

ASST. COMM. (MKT.)